# ‘प्रसिध्दी पत्रक’

# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**मंगळवार, दि.१०/०९/२०१९**

## “जुगार अड्डयावर छापा.”

**पोलीस ठाणे, कळंब:** दि. ०९.०९.२०१९ रोजी १५.०५ वा. सु. आठवडा बाजार कळंब येथे १) दशरथ चंदु शिंदे रा. हिंगोली २) विशाल रमेश बनसोडे रा. कळंब, ता.कळंब हे सुरट जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्य व रोख रक्कम ३,६४०/-रु.च्या मालासह पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.जु.का. कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. ०९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “अवैध मद्य विक्री विरुध्द ३ कारवाया”

**पोलीस ठाणे, ढोकी:** दि. ०९.०९.२०१९ रोजी १५.३० वा. सु. संगीता जगदिश जाधव रा. कोंड, ता.जि.उस्मानाबाद ह्या दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे कोंड शिवारात १५ ली. गावठी दारु किं.अं. ९००/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, ढोकी यांच्या पथकास आढळुन आल्या. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, ढोकी येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. ०९.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**पोलीस ठाणे, शिराढोण:** दि. ०९.०९.२०१९ रोजी १७.४० वा. सु. रामराव हरीभाउ पवार रा. घारगाव तांडा, ता.कळंब हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे घारगाव तांडा येथे १६ ली. गावठी दारु किं.अं. ९९०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, शिराढोण यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, शिराढोण येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. ०९.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**पोलीस ठाणे, कळंब:** दि. ०९.०९.२०१९ रोजी २०.४५ वा. सु. गोरख राजेंद्र शिंदे रा. ईटकुर गायराण पारधी पिडी, ता.कळंब हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने त्यांच्या घरासमोर १५ ली. गावठी दारु व साहित्यासह किं.अं. ९५०/रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. ०९.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

## “पैश्यासाठी सुनेचा छळ.”

**पोलीस ठाणे, मुरुम:** १) प्रकाश भिल्लु जाधव (पिडीत महिलेचा पती) २) भिल्लु कृष्णा जाधव (सासरा) ३) फुलाबाई भिल्लु जाधव (सासु) ४) राजु भिल्लु जाधव (दिर) ५) रवि भिल्लु जाधव (दिर) ६) पुतळाबाई राजु जाधव (जाऊ) ७) दामिणी रवि जाधव (जाऊ) ८) शिला बाबु राठोड (नणंद) ९) शारदा रवि राठोड (नणंद) सर्व रा. गांधीनगर लमाणतांडा, दुधणी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांनी आपापसात संगणमत करुन दि. १०.०५.२००६ ते दि. ०५.०८.२०१९ दरम्यान अनेकदा त्यांची सुन श्रीमती सविता प्रकाश जाधव,

वय ३५ वर्षे, यांनी घर घेण्यासाठी माहेरहुन पैसे आणण्याकरीता त्यांचा शारीरिक-मानसीक छळ करुन त्यांना घराबाहेर हाकलले. तसेच लोहारा येथे त्यांच्या माहेरी जाउन त्यांच्या आई-वडीलांनाही त्रास दिला. अशा मजकुराच्या सविता प्रकाश जाधव यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, मुरुम येथे भा.दं.वि. कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ३४ अन्वये गुन्हा दि. ०९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“ विवाहाचे आमीष दाखवुन तरुणीवर लैंगीक अत्याचार.”**

**<u>पोलीस ठाणे, उमरगा:</u>** नागेश धनाजी क्षीरसागर रा. कुंभारी, ता.तुळजापूर याने एका २५ वर्षीय तरुणीस (नाव-गाव गोपनीय) तिच्या सोबत विवाह करण्याचे आमिष दाखवून दि. १०.०३.२०१८ रोजी पासुन आज पर्यंत वेळोवेळी तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. तसेच वेळोवेळी तिला शिवीगाळ करुन मारहान केली. अशा मजकुराच्या पिडीत तरुणीच्या फिर्यादीवरुन वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे भा.दं.वि. कलम ३७६, ४१७, ४२०, ३२३, ५०४ प्रमाणे गुन्हा दि. ०९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“उस्मानाबाद: कार-मोटारसायकल अपघात.”**

**<u>पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर):</u>** दि. ०८.०९.२०१९ रोजी २३.०० वा. सु. युसूफ मुस्तफा शेख हे वसीम मोबीन मोमीन रा. सांजावेस गल्ली, उस्मानाबाद यांना मोटारसायकल क्र. एम.एच. २५ एबी ३३२६ वर सोबत घेवुन मोटारसायकल चालवत घरी जात असतांना साठे चौक, उस्मानाबाद येथे अज्ञात कार चालकाने पांढऱ्या रंगाची स्वीफ्ट डिझायर कार निष्काळजीपणे चालवुन त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात मोटारसाकयलवरील दोघे पुरुष जखमी झाले. अपघातानंतर जखमींना वैद्यकिय मदत मिळवुन न देता आणि अपघाताची खबर पोलीस ठाण्यास न देता कार चालक कारसह अपघातस्थळावरुन निघुन गेला. अशा मजकुराच्या वसीम मोमीन यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान (एम.एल.सी.) दिलेल्या जबाबावरुन अज्ञात स्वीफ्ट डिझायर कार चालकाविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (श.) येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३७ सह मो.वा.का. कलम १३४ (अ)(ब) प्रमाणे गुन्हा दि. ०९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: ११३ कारवाया.”**

**<u>उस्मानाबाद जिल्हा:</u>** दि. ०९/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार ११३ कारवाया केल्या असुन त्यातुन २५,००० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल करण्यात आले आहे.

---

**स्वाक्षरीत**

**(विनोद ज. चौधरी)**

सहा.पोलीस निरीक्षक

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद

प्रति,

मा.संपादक ……………………………………………………….

आपल्या प्रसारमाध्यमांमध्ये हे पत्रक प्रसिध्दीस देण्यास विनंती आहे.